१८ जुलै २००२ पुढारी

# कमला कॉलेज येथे गुणवंतांचा सत्कार

कोल्हापूर, दि. १५ : ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते प्रा. डॉ. सी. व्ही. व्ही. मैंदर्गी यांचा वाणिज्य शाखेत 'इम्पॅक्ट ऑफ अर्बन कन्झुमर्स इन सिलेक्टेड कमोडिटीज' या विषयावर पीएच.डी.ची पदवी प्राप्त केल्याबद्दल व कु. प्रियदर्शनी पोवार ही बारावी शास्त्र शाखेत अठरावी आली त्याबद्दल सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. सौ. टी. पी. पाटील यांनी केले. तर प्रा. सौ. ए. व्ही. पाठक यांनी आभार मानले. उपप्राचार्य प्रा. एस. एन. कोळेकर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.